२ पुढारी MY कोल्हापूर शुक्रवार, १० एप्रिल २०२६

संक्षिप्त

# विवेकानंद महाविद्यालयाकडून सायबर गुन्ह्यांसंदर्भात नागरिकांमध्ये जनजागृती

**कोल्हापूर :** विवेकानंद कॉलेजमधील वाणिज्य विभाग, आयक्यूएसी व सायबर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर गुन्हेगारी सुरक्षितता अभियान राबविण्यात आले. अभियानात सायबर गुन्हेगाराकडून नागरिकांची होणारी फसवणूक टाळण्यासाठी आवश्यक गोष्टी संदर्भात जनजागृती करण्यात आली. अभियानामार्फत कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग जिल्हे व शहरीभाग व २७गावांतील ग्रामपंचायत यांच्या सहकार्याने १,३५० पेक्षा जास्त कुटुंबांमध्ये जनजागृती करण्यात आली. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, आयक्यूएसी समन्वयक डॉ. श्रुती जोशी, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा. सनी काळे, सायबर पोलिस विभागाचे सागर माळवे, सुकुमार जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. अभियानाचे समन्वयक डॉ. उमेश दवडे यांनी कार्यक्रम यशस्वितेसाठी परिश्रम घेतले.

पुण्य नगरी ▮ शुक्रवार, १० एप्रिल २०२६

# अर्पिता हावळचे स्पर्धा परीक्षेत यश

**कोल्हापूर :** आंबेवाडी (ता. करवीर) येथील अर्पिता सचिन हावळ हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये कर सहायक व महसूल सहायक या पदांसाठी निवड झाली. अर्पिताचे प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर आंबेवाडी येथे, तर माध्यमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल, कोल्हापूर येथे झाले. तिने विवेकानंद महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. कोणत्याही क्लासशिवाय तिने घरीच राहून अभ्यास केला. पहिल्याच प्रयत्नात तिने घवघवीत यश मिळवले.



लोकमत
कोल्हापूर, शनिवार, दि. ११ एप्रिल २०२६

|| ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार || शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

*Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's*

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR



**(An Empowered Autonomous Institute)**
**Tarabai Park, Kolhapur**
**(Accredited "A+" with CGPA 3.29 by NAAC**
**College with Potential for Excellence (ISO 9001-2015)**
**College website : www.vivekanandcollege.ac.in**
**Office : 0231-2658612**

## POST GRADUATE (PG) ENTRANCE EXAMINATION NOTIFICATION

Online applications are invited from the eligible candidates for the following **First Year Post Graduate Degree Programs** as per NEP-2020 for the **Academic Year 2026-27.**

| Sr. No. | Name of the PG Program | Intake Capacity |
|---|---|---|
| 1 | M.Sc. Physics | 40 |
| 2 | M.Sc. Organic Chemistry | 40 |
| 3 | M.Sc. Analytical Chemistry | 40 |
| 4 | M.Sc. Mathematics | 50 |
| 5 | M.Sc. Statistics | 20 |
| 6 | M.Sc. Applied Statistics | 20 |
| 7 | M.Sc. Biotechnology | 20 |
| 8 | M.Sc. Computer Science | 20 |
| 9 | M. A. Geography | 50 |
| 10 | M.Sc. Microbiology | 40 |
| 11 | M. Sc. Geoinformatics | 30 |
| 12 | M.Sc. Zoology | 20 |
| 13 | P.G. Diploma In Geoinformatics | 30 |

**Note :**

- Direct Admission for M. A. History, Master of Correctional Administration, Master of Rural Studies and M. Com.
- Eligibility for every program as per regulation given by UGC / Government of Maharashtra & Shivaji University, Kolhapur.
- **ONLINE FORM** of Entrance Examination will be available on the college website : www.vivekanandcollege.ac.in from 10-04-2026.
- Entrance Examination will be conducted through ONLINE MODE.
- Date of Entrance Examination will be declared later on the college website.
- Dates for online registration and registration fee are as follows :
  i) Up to 20th April 2026 Rs. 300/-
  ii) Up to 30th April 2026 Rs. 500/-
- Candidates are advised to visit our college website from time to time for further details.

Place : KOLHAPUR
Date : 10-04-2026

Sd./- **Prof. (Dr.) C. B. Patil**
Principal,
Vivekanand College, Kolhapur
(An Empowered Autonomous Institute)

पुण्य नगरी
सोमवार, १३ एप्रिल २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये महात्मा जोतिबा फुले जयंती साजरी

**कोल्हापुर :** विवेकानंद कॉलेजमध्ये क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील व लालबहादुर शास्त्री कॉलेज, साताराचे प्राचार्य डॉ. शेखर मोहिते यांच्या हस्ते महात्मा जोतिबा फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विवेकानंद कॉलेजच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने आयोजित महात्मा जोतिबा फुले जयंती समारंभात बोलताना प्रा. समीक्षा फराकटे म्हणाल्या, महात्मा जोतिबा फुले स्त्री शिक्षण व बहुजन शिक्षणाचे प्रणेते होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने स्त्री शिक्षणाचा पाया घालून मोठी क्रांती घडवली. फातिमा शेख, ताराबाई शिंदे या त्यांच्या शिक्षणप्रसाराच्या विचारांनी प्रेरित झाल्या. समतेची ज्योत अखंड तेवत ठेवणे, हीच महात्मा जोतिबा फुले यांना खरी आदरांजली असेल. आभार डॉ. कविता तिवडे यांनी मानले. यावेळी आयक्यूएसीप्रमुख डॉ. श्रुती जोशी, डॉ. एकनाथ आळवेकर, प्रा. विश्वंभर कुलकर्णी, रजिस्ट्रार एस. के. धनवडे आदी उपस्थित होते.

26

दैनिक जय महाभारत
संपादक - विजयकुमार वाकळे



# विवेकानंद कॉलेजमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात

कोल्हापूर (दै.महाभारत)
विवेकानंद महाविद्यालयात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.प्रा. समीक्षा फराकटे यांनी मनोगतात आंबेडकर यांच्या समानता, सामाजिक न्याय व मानवतेच्या विचारांचा उल्लेख केला. महिलांच्या हक्कांसाठी त्यांनी केलेल्या कार्याचीही त्यांनी माहिती दिली. प्रास्ताविक डॉ. जी. एस. उबाळे यांनी, तर आभार प्रा. एच. व्ही. चामे यांनी मानले.

यावेळी डॉ. टी. सी. गौपाले, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. सौ. एम. आर. माने, प्रा. यु. एच. तिजईकर, प्रा. सौ. एस. पी. पाटील, प्रा. संपदा टिपकुर्ले, प्रा. नयना पाटील, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सदानंद दुर्गुळे, अमर जाधव, वसंत पाटील, सर्जेराव खोत, अजित जाधव, संजय पोवार, सागर कांबळे, व्ही. एस. खंदारे, आर. डी. माने, विनायक जाधव तसेच प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्य नगरी । बुधवार, १५ एप्रिल २०२६

## विवेकानंद कॉलेज

विवेकानंद महाविद्यालयात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती साजरी करण्यात आली. प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी विचार मांडले. प्रास्ताविक भूगोल विभागप्रमुख डॉ. जी. एस. उबाळे यांनी केले. आभार प्रा. एच. व्ही. चामे यांनी मानले. डॉ. टी. सी. गौपाले, प्रा. पी. आर. बागडे, प्रा. एम. आर. माने, प्रा. यू. एच. तिजईकर, प्रा. एस. पी. पाटील, प्रा. संपदा टिपकुर्ले, प्रा. नयना पाटील, प्रा. एस. पी. पाटील, रजिस्ट्रार एस. के. धनवडे, सदानंद दुर्गुळे, अमर जाधव, वसंत पाटील, सर्जेराव खोत, अजित जाधव, संजय पोवार, सागर कांबळे, व्ही. एस. खंदारे, आर. डी. माने, विनायक जाधव आदी उपस्थित होते.

तरुण भारत संवाद | कोल्हापूर दिनांक

बुधवार, दि. १५ एप्रिल २०२६

# अर्पिता हावळ यांची कर सहायक, महसूल सहायकपदी निवड

**कोल्हापूर :** अथक परिश्रम व अभ्यासाच्या जोरावर आंबेवाडी (ता. करवीर) येथील अर्पिता सचिन हावळ यांनी शासकीय सेवेतील कर सहायक व महसूल सहायक हे पद प्राप्त केले आहे. या पदापर्यंत झेप घेण्यासाठी अर्पिता यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून घेतली जाणारी परीक्षा दिली. या परीक्षेत अर्पिता यांनी धवल यश मिळवले. अर्पिता हावळचे



प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर आंबेवाडी व माध्यमिक शिक्षण कोल्हापुरातील राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूलमधून झाले आहे. तसेच महाविद्यालयीन शिक्षण विवेकानंद कॉलेजातून पूर्ण केले आहे.त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा देण्यासाठी कोणताही क्लास लावला नव्हता.घरी मदत करतच अभ्यास केला. पहिल्याच प्रयत्नात त्या उत्तीर्ण झाल्यामुळे त्यांच्यावर मित्रमंडळी, नातेवाईकसह समाजातील सर्वच स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

सकाळ
कोल्हापूर, बुधवार, १५ एप्रिल २०२६

## विवेकानंद महाविद्यालय

प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन केले. प्रा. समीक्षा फराकटे यांनी मनोगत व्यक्त केले. भूगोल विभागप्रमुख डॉ. जी. एस. उबाळे, प्रा. एच. व्ही. चामे, डॉ. टी. सी. गौपाले, प्रा. पी. आर. बागडे, रजिस्ट्रार एस. के. धनवडे उपस्थित होते.

सकाळ कोल्हापूर, गुरुवार, १६ एप्रिल २०२६

# अर्पिता हावळचे यश



अर्पिता हावळ

कोल्हापूर : आंबेवाडी (ता. करवीर) येथील अर्पिता सचिन हावळ हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे झालेल्या परीक्षेत कर सहाय्यक व महसूल सहाय्यक या पदांसाठी निवड झाली. अर्पिताचे प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर, आंबेवाडी येथे तर माध्यमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल येथे झाले. तिने विवेकानंद महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. कोणत्याही क्लासशिवाय तिने घरीच राहून अभ्यास केला. पहिल्याच प्रयत्नात तिने यश मिळविले.

5.28

जनप्रवास
शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६



# विवेकानंद कॉलेजमध्ये अर्पिता हावळ यांचा सत्कार

**जनप्रवास : कोल्हापूर**

येथील विवेकानंद कॉलेजची माजी विद्यार्थिनी अर्पिता सचिन हावळ हिची महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे घेतलेल्या परीक्षेमध्ये कर सहायक व महसूल सहायक या पदांसाठी निवड झाली. त्याबद्दल तिचा विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. पाटील म्हणाले, अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अर्पिताने मिळविलेले हे यश अभिमानास्पद आहे. तिच्या या यशामुळे विवेकानंद कॉलेजच्या नावलौकिकात भर पडली आहे. तिला पुढील यशस्वी वाटचालीसाठी मी शुभेच्छा देतो. अर्पिताचे प्राथमिक शिक्षण विद्यामंदिर आंबेवाडी, (ता.करवीर) येथे, तर

- **कर सहायक व महसूल सहायकपदी निवडीची दखल**
- **यशाबद्दल प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी काढले गौरवोद्गार**

माध्यमिक शिक्षण राजर्षी छत्रपती शाहू महाराज हायस्कूल, जुना बुधवार, कोल्हापूर येथे झाले. तिने विवेकानंद महाविद्यालयात पदवीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले.

कोणत्याही क्लासशिवाय तिने घरीच राहून अभ्यास केला. पहिल्याच प्रयत्नात तिने मिळविलेले घवघवीत यश निश्चितच कौतुकास्पद आहे. या यशाबद्दल तिचे महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

1.4.26

सकाळ TODAY कोल्हापूर, रविवार, २६ एप्रिल २०२६

# कल्पक चिले राज्यात प्रथम


कल्पक चिले

**कोल्हापूर :** महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे झालेल्या परीक्षेत पाचगाव येथील कल्पक चिले यांनी कर सहायक आणि महसूल सहायक अशा दोन पदांवर यश मिळवले. विशेष म्हणजे कर सहायक परीक्षेत एनटी- 'ब' प्रवर्गातून राज्यात प्रथम क्रमांक मिळविला. श्री. चिले यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण न्यू हायस्कूल येथे झाले. त्यानंतर गणित विषयातून पदवीपर्यंतचे शिक्षण विवेकानंद कॉलेज येथे झाले. शिवाजी विद्यापीठ येथून पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. २०२४ मध्ये त्यांची सहायक प्राध्यापक पदावर निवड झाली होती. पाच वर्षांपासून ते शिवाजी विद्यापीठ परिसरात सातत्याने स्पर्धा परीक्षेची तयारी करत होते. या कालावधीत काही संधी थोडक्यात हातातून निसटल्या, तरीही धीर न खचू देता स्व-अभ्यासावर भर देत त्यांनी तयारी सुरू ठेवली. अखेर उल्लेखनीय यश मिळवले. मामा प्रकाश गवळी, आजी सोनाबाई गवळी, आई अर्चना आणि वडील अनिल यांचे प्रोत्साहन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर सोमवार, २७ एप्रिल २०२६

# बुद्धिबळ स्पर्धेत ऋषिकेश, शर्वरी यांचे यश

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बडोदा गुजरात येथे शक्ती चषक ध्रुवीक चेस अकादमी आयोजित आंतरराष्ट्रीय फिडे क्लासिक रेटिंग बुद्धिबळ स्पर्धेत कोल्हापूरच्या ऋषिकेश कबनूरकर व शर्वरी कबनूरकर या भावा-बहिणीने यशस्वी कामगिरी केली. ऋषीकेशने ७ गुणांची कमाई करत १८०० रेटिंग गटात प्रथम क्रमांक पटकविला.

शर्वरीने साडेपाच गुणांसह ३४ फिडे गुणाची कमाई करीत महिला गटात प्रथम क्रमांक मिळविला. स्पर्धेत ७ ग्रँड मास्टर २३९ मानांकित सह ३६४ खेळाडूंनी सहभागी झाले होते. ऋषीकेश विवेकानंद तर शर्वरी



ऋषीकेश कबुनरकर शर्वरी कबनुरकर

केआयटी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. दोघेही अनुज ॲकॅडमीचे खेळाडू आहेत. त्यांना अभयकुमार साळुंखे, शुभांगी गावडे, कौस्तुभ गावडे, प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार, डॉ. विकास जाधव, जिल्हा बुद्धिबळ असो.चे कृष्णात पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.

पुढारी MY कोल्हापूर बुधवार, २९ एप्रिल २०२६

# 'विवेकानंद'च्या खेळाडूंचे रग्बी स्पर्धेत यश

कोल्हापूर : भुवनेश्वर (ओडिसा) येथील केआयआयटी विद्यापीठात झालेल्या ऑल इंडिया इंटर युनिव्हर्सिटी महिला व पुरुष रग्बी स्पर्धेमध्ये विवेकानंद महाविद्यालयाच्या खेळाडूंनी यश संपादन केले. श्वेता चिक्कोडी, रितिका मगदूम, सिद्धेश देवाने आणि हर्षवर्धन धनंजय पाटील यांनी शिवाजी विद्यापीठाच्या रग्बी संघाचे प्रतिनिधित्व करत रौप्य पदक मिळवून दिले. त्यांना प्रभारी प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. श्रुती जोशी, जिमखाना विभागप्रमुख डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले यांचे मार्गदर्शन लाभले.

पुण्य नगरी ■ गुरुवार, ३० एप्रिल २०२६

# 'विवेकानंद'मध्ये राजेंद्र साळुंखे यांचा सेवा गौरव



कोल्हापूर : प्रतिनिधी

येथील विवेकानंद कॉलेजमधील राजेंद्र साळुंखे हे ३४ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. यानिमित्त त्यांच्या कार्याचा गौरव करत प्रशासकीय स्टाफच्या वतीने सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमात शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आणि कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे यांच्या हस्ते मानपत्र देऊन साळुंखे त्यांचा सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविक व स्वागत पतसंस्थेचे अध्यक्ष हितेंद्र साळुंखे यांनी केले, तर मानपत्राचे वाचन अमित साळुंखे यांनी केले. यावेळी बोलताना कौस्तुभ गावडे यांनी विवेकानंद संस्थेतील कार्यकर्ते हे एक कुटुंब असल्याचे सांगून, निष्ठेने केलेल्या सेवेमुळेच असा गौरव मिळतो, असे मत व्यक्त केले.

यावेळी प्रा. प्रकाश साळुंखे, भरत कवठेकर, राजकुमार देसाई, प्रतीक साळुंखे, अनिल पवार, डॉ. नीता पाटील, प्रा. मनीषा साळुंखे यांनी मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना राजेंद्र साळुंखे यांनी संस्थेमुळेच आपले जीवन घडले असून, मिळालेल्या सामाजिक सन्मानाबद्दल ते संस्थेचे आजन्म ऋणी राहतील, असे सांगितले.

अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी सेवानिवृत्ती हा भावनिक टप्पा असल्याचे सांगून साळुंखे यांच्या पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. आभार बबन करपे यांनी, तर सूत्रसंचालन अमर जाधव यांनी केले. कार्यक्रमास कर्मचारी, प्राध्यापक, नातेवाईक आणि मित्रपरिवार उपस्थित होता.

दैनिक
जनप्रवास
बातम्यांचा राजा
• गुरुवार
दि. ३० एप्रिल २०२६

# विवेकानंद कॉलेजमध्ये राजेंद्र साळुंखे यांचा सेवा गौरव

**जनप्रवास : कोल्हापूर**

येथील विवेकानंद कॉलेजमधील राजेंद्र साळुंखे हे ३४ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. या निमित्ताने त्यांचा प्रशासकीय स्टाफच्या वतीने प्रमुख पाहुणे स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे विशेष कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे आणि कोल्हापूर विभागप्रमुख डॉ. श्रीराम साळुंखे यांच्या हस्ते मानपत्र, शाल श्रीफळ, पोशाख देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात रोपास पाणी घालून झाली. प्रास्ताविक व स्वागत श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेच्या सेवकांच्या पतसंस्थेचे अध्यक्ष हितेंद्र साळुंखे यांनी केले. मानपत्राचे वाचन अमित साळुंखे यांनी केले. याप्रसंगी गावडे म्हणाले, विवेकानंद संस्थेतील सर्व गुरुदेव कार्यकर्ते हे एक कुटुंब आहे आणि आपण सर्वजण बापूजींचे वैचारिक वारसदार आहोत. सेवा बजावत



असताना कामावर निष्ठा ठेवून काम करा, म्हणजे असा सेवागौरव होतो तसेच प्रामाणिकपणाच्या सेवेचे फळ मिळते. त्यांनी केलेल्या प्रामाणिक सेवेचा आदर्श इतरांनीही घ्यावा.

डॉ. श्रीराम साळुंखे म्हणाले, कुटुंबातील स्थान अबाधित ठेवणारे व्यक्तिमत्व म्हणजे राजेंद्र साळुंखे. त्यांनी दोन पिढ्यांमधील जिव्हाळा जपला. समाजात बापूजींच्या कार्याचा सन्मान वाढवण्याचे काम त्यांनी केले आहे. यावेळी प्रा. प्रकाश साळुंखे, भरत कवठेकर, राजकुमार देसाई, प्रतीक साळुंखे, अनिल पवार, डॉ. नीता पाटील, प्रा. मनीषा साळुंखे यांनी मनोगते मांडली.

प्राचार्य डॉ. सी. बी. पाटील यांनी सेवानिवृत्ती हा भावनिक क्षण असल्याचे सांगून शुभेच्छा दिल्या. आभार बबन करपे यांनी तर सूत्रसंचालन अमर जाधव यांनी केले.

**संस्थेचा आजन्म ऋणी राहीन...**

सत्काराला उत्तर देताना राजेंद्र साळुंखे म्हणाले, या विवेकानंद शिक्षण संस्थेमुळे माझे जीवन घडले. मला सामाजिक मान सन्मान मिळाला, माझे कुटुंब स्वावलंबी झाले, त्याबद्दल मी या संस्थेचा आजन्म ऋणी राहीन.

30/4/26